जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)

# मंत्रिमंडळ निर्णय

**दिनांक २९ जून, २०२५**
**(बैठक क्र. २६ - अधिवेशन कालावधी)**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चा आराखडा, आवश्यक पदनिर्मितीस मान्यता | **कृषि विभाग** |

<u>कृषि विभाग</u>

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चा आराखडा, आवश्यक पदनिर्मितीस मान्यता

जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ च्या अंमलबजावणीस आज झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हा प्रकल्प राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव आणि नाशिक या २१ जिल्ह्यांमधील निवड करण्यात आलेल्या ७ हजार २०१ गावांमध्ये सन २०२५-२६ पासून पुढील ६ वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पात ७०० दशलक्ष डॉलर्स (अंदाजे रू.६००० कोटी) गुंतवणूक करण्यात येणार आहे. त्यापैकी ७० टक्के निधी (४९० दशलक्ष डॉलर्स म्हणजे अंदाजे रू.४२०० कोटी) जागतिक बँकेकडून अल्प व्याज दराच्या कर्ज स्वरूपात आणि ३० टक्के निधी (डॉलर्स २१० दशलक्ष म्हणजे अंदाजे रू.१८०० कोटी) राज्य शासनाच्या स्वनिधीतून गुंतवणूक करण्यात येणार आहे.

प्रकल्पात शेतकरी, भूमिहीन कुटुंबे, शेतकरी गट, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी उत्पादक कंपन्या इत्यादी विविध वर्गातील लाभार्थी असतील. अनुसूचित जाती व जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण असा प्राधान्यक्रम असेल. लाभ थेट हस्तांतर (DBT) पध्दतीने लाभार्थ्यांच्या आधार बँक खात्यावर वितरित करण्यात येईल.

या प्रकल्पाकरिता, प्रकल्प संचालक पदासह एकूण १७२ नियमित पदे निर्माण करण्यास व १ हजार ८५ पदासाठींच्या मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली.

प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (Project Implementation Plan), प्रापण पुस्तिका (Procurement Manual), वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका (Financial Management Manual), भागधारक सहभाग आराखडा (Stakeholder Engagement Plan) आणि पर्यावरणीय व सामाजिक बांधिलकी आराखडा (Environment and Social Commitment Plan) या विविध कार्यपुस्तिकांनुसार प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेदरम्यान प्रकल्प करार (Project Agreement) व कर्ज करार (Loan Agreement) करण्यात येणार आहे. यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग व प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले.

*****